# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २५/०९/२०२४ (बुधवार) सकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण ६,८०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २४/०९/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर तथा सहायक पोलीस अधीक्षक (भा.पो.से) श्री. अनिल म्हस्के यांच्या आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर येथील स्टाफ पो. स्टे. केळवद हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सावंगा येथुन एक लाल रंगाचे ट्रॅक्टर व लाल रंगाचे ट्रॉलीमध्ये रेतीची चोरटी वाहतूक करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता एक्टीवा क्र. एम एच—४०/सी एन—०७४७ चा चालक ट्रॅक्टरचे समोर राहुन ट्रॅक्टर चालकाला रोडच्या दिशा दाखवत होता. एक्टीवा गाडीच्या मागेच सदर ट्रॅक्टर क्र. एम पी—२८/झेड— ई—२३६८ लाल रंगाचे महींद्रा कंपनीचे ट्रॅक्टर व लागुन लाल रंगाचे विना नंबरची ट्रॉली थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून ट्रॅक्टर क्र. एम पी—२८/झेड ई—२३६८ किंमती ५,००,०००/—रू. ट्रॉली किंमती १,००,०००/—रू. मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ६०००/— रू., ०२ रेडमी कंपनीचे मोबाईल किंमती १४०००/—रू.एक्टीवा गाडी क्र. एम एच—४०/सी एन—०७४७ किंमती ६०,०००/— रू. असा एकुण ६,८०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर ट्रॅक्टर **चालक नामे— आकाश डोमाजी तिबोले, वय २६ वर्ष, रा. सावंगा ता. सौसर जि. पांढुर्णा व एक्टीवा गाडीचा चालक व ट्रॅक्टरचा मालक नामे— रविंद्र श्यामराव अंबरते, रा. सावंगा ता. सौसर जि. पांढुर्णा** यांचेविरुद्ध कलम ३०३(२), ३(५) बि.एन.एस २०२३, सहकलम ४८(८) जमीन महसुल अधि. १९६६, सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रति अधि. १९६६, सह. ४, २१ खाण ,खनिज अधि. १९५७ अन्वये पो.स्टे. केळवद येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर तथा सहायक पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील सफौ. सुरज परमार, पोहवा प्रमोद तभाने, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग कार्यालय येथील चालक सफौ गुणेश्वर डाखोळे, पोअं. नितीन मसराम यांनी केली.

## पोलीस ठाणे रामटेक नागपूर ग्रामीण कडुन इंडस्ट्रीयल मशीन चोरीचा गुन्हा उघडकिस

पोलीस ठाणे रामटेक येथे गुन्हा रजि. नं. ५५५/२०२४ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता मधील फिर्यादी नामे हेमंत पुंडलीकराव रेवतकर, वय ५२ वर्ष रा. वार्ड क्र. ०४, शितलवाडी रामटेक यांचा १५ वर्षापासुन फर्निचरचा कारखाना असुन त्या ठिकाणी तीन ते चार लोक काम करत असतात दि. ०५/०७/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. फर्निचरच्या कारखान्यात जावुन पाहिले असता कारखान्यात झाकुन ठेवलेली मक्की कंपनीची इंडस्ट्रीयल मशीनचा मुंडा किं. २६,०००/—रू. ची दिसुन आली नाही. ती मशीन दि. ०४/०७/२०२४ ते दि. ०५/०७/२०२४ रोजी रात्री दरम्यान चोरांनी चोरून नेली होती. सदर गुन्हयात गोपनीय बातमीदार यांचे कडुन माहिती प्राप्त करून आरोपी नामे १) पिंटु उर्फ मनमोहन छोटेलाल नारनवरे, वय २५ वर्ष २) अजय उर्फ पप्पु दिनेश ठाकरे, वय २५ वर्ष ३) सुरेंद्र उर्फ मंगल कृष्णाजी ढोमणे वय २५ वर्ष तिन्ही रा. संजय नगर गोविंदपुरा बंडु चौक नाल्याजवळ गोंदिया यांना निष्पन्न करण्यात आले असुन सदर गुन्हयात आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. आरोपी पीसीआर मध्ये असुन पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांचे मार्गदर्शनात पोनी श्री. प्रशांत काळे, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे रामटेक पोहवा अमोल इंगोले, पोना मंगेश सोनटक्के, पोना प्रफुल रंधई, पोशी धिरज खते, पोशी शरद गिते यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**